**विशेष दिवाणी दावा २५७/२०२५**
**निशाणी क्रमांकः– २७ खाली**
**मारूती गायकवाड व इ. वि. अरूमुगम व इतर**

**वादी तर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची शपथेवरील जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नावः– राम भागवत वाघमारे

**वादीचा सरतपास वकील श्री. व्ही. व्ही. पाटील यांचे मार्फत शपथेवर पुढे सुरू**

**०१.** सदर प्रतिज्ञापत्रातील मजकूर माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला असून तो बरोबर आहे व तो वाचल्यानंतर तसेच माझे वकिलांनी तो समजावून सांगितल्यानंतर मी त्यावर सही केली आहे. प्रतिवादी यांनी बिल्डरकडुन विकत घेतलेल्या वाद मिळकतीचे सुची क्र. २ ची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि. ३०** देण्यात येत आहे. प्रतिवादी यांनी बिल्डरकडुन विकत घेतलेल्या वाद मिळकतीच्या नोंदणीकृत करारनामा क्र. ५९२८/२०२२ ची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि. ३१** देण्यात येत आहे. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दि. ३०/१२/२०२३ रोजी झालेले नोटरी केलेले मुळ ठरावपत्र मी दाखल केला आहे. त्यावर माझी, वादी क्र. १ व प्रतिवादी यांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि. ३२** देण्यात येत आहे. वादी व प्रतिवादी क्र. १ यांच्यामध्ये दि. ०१/१२/२०२४ रोजी झालेले नोटरी केलेले मुळ ठरावपत्र मी दाखल केला आहे. त्यावर माझी, वादी क्र. १ व प्रतिवादी क्र. १ यांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि. ३३** देण्यात येत आहे. मी प्रतिवादींना दि. १४/०२/२०२५ रोजी वकिलांमार्फत पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत दाखल केली आहे. त्यावर वादी क्र. १ व आमचे वकिल पुजा भस्मे यांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि. ३४** देण्यात येत आहे. दैनिक कृषीवल या पेपरमध्ये दि. १९/०८/२०२५ रोजी जाहिर नोटीस प्रकाशित केली होती तो पेपर मी दाखल केला

आहे. त्यास **आर्टीकल अ** देण्यात येत आहे. वाद मिळकत असलेल्या सोसायटीच्या अध्यक्षांना वादी क्र. १ यांनी दि. १४/०२/२०२५, दि. २५/०२/२०२५ व दि. २८/०२/२०२५ या तारखांना पाठविलेल्या पत्रांच्या स्थळप्रती मी दाखल केल्या आहेत. त्यावर वादी क्र. १ यांची सही आहे. त्या सहया त्यांनी माझ्या समोरच केल्या आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यांना अनु. **नि. ३५ ते ३७** देण्यात येत आहे. **नि. ३६ व ३७** वरील पत्र पोस्टाने पाठविल्याबाबत पोष्टाच्या मुळ पावत्या दाखल केल्या आहेत. त्यांना **नि. ३८ व ३९** देण्यात येत आहे. **नि. ३७** वरील पत्र सोसायटीच्या अध्यक्षांना प्राप्त झाल्याबाबत पोष्टचा ट्रॅक रिपोर्ट दाखल केला आहे. त्यास **नि. ४०** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**
**प्रतिवादीविरूध्द प्रकरण एकतर्फा असल्यामुळे उलटतपास नाही.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.04.09 13:52:52 +0530

**ठिकाणः पनवेल** **(आर. वाय. खंडारे)**
**दिनांकः– ०९/०४/२०२६.** **५ वे सह दिवाणी न्यायाधीश,**
**व.स्तर, पनवेल**